# चिरंजीवी व्यास महर्षी

**इंद्रायणी सावकार**


**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**चिरंजीवी व्यास महर्षी**
इंद्रायणी सावकार

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
इंद्रायणी सावकार
इ-१००१-५ मंत्री एलिगन्स,
एम. एस. पाल्या, बेंगलोर- ५६००७६
मो. नं. : ०९३२३८७४२२१, ०८०४१५७२९८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४२०/-

व्यासांचे हे चरित्र शितल मेहतांना अर्पण करणे क्रमप्राप्तच झाले. कारण व्यास आधी त्यांच्याकडे गेले. मग ते त्यांना घेऊन माझ्याकडे आले.

शितल मेहता
यांना अर्पण...

## वाचकांशी हितगूज

योगायोग फार गमतीचे असतात. विशेष म्हणजे ते योगायोग आहेत हे आपल्याला त्यावेळी कळत नाही. नंतर केव्हातरी कळते. अशी एक घटना माझ्या व सौ. सुजाता जोग हिच्या आयुष्यात आम्ही एकत्र असताना डोकावली. सुजाता माझी जिवलग मैत्रीण. माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान. पत्रकार, लेखिका आणि आता मॉडेलही. अनेक जाहिरातींत, चित्रपटांत व मालिकांत तिनं भूमिका केल्या आहेत. उदाहरणार्थ, सलमान खानच्या बजरंगी भाईजानमध्ये ती करीना कपूरची आजी आहे. ती, मी व प्रभाकर शिवाजी पार्कच्या 'जिप्सी'मध्ये २० ऑक्टोबर २०१५ ला दुपारचे जेवण घेत होतो. शेजारच्याच टेबलावर मनीषा सोमण बसली होती. पत्रकार आहे. तिचे लेख मी वाचले आहेत. पण प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. 'सामना'च्या पुरवणीत मनीषाने अनेक लेख लिहिले आहेत. त्यावेळी सुजाता पुरवणीची संपादिका होती. म्हणून त्या दोघींचा परिचय होता. अर्थात् माझाही आता झाला. थोड्या गप्पागोष्टी झाल्यानंतर मनीषानं विचारलं, 'भाषांतरं करता का? कराल?' विशेष चौकशी करता कळलं की कोल्हापूरच्या 'रिया पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहतांना इंग्रजी कादंबऱ्यांची भाषांतरं करून हवी आहेत. मी तात्काळ नकार दिला. भाषांतरं करायची नाहीत असं मी अनेक वर्षांपूर्वीच ठरवलं आहे. मात्र इंग्लिश व फ्रेंच कादंबऱ्यांचा परिचय करून देणारे अनेक लेख मी 'लोकसत्ता' व 'स्वराज्य' मधून लिहिले आहेत.

त्यावेळी तो विषय तिथेच संपला. पण नंतर माझ्या व सुजाताच्या मनात विचार आला की 'निदान भाषांतरं करण्यासाठी पुस्तके कोणती उपलब्ध आहेत त्याची माहिती तरी करून घ्यावी. आपले मराठी भाषेवर एवढे प्राणांतिक प्रेम आहे तर मराठी भाषेत एखाद्या चांगल्या पुस्तकाची भर घालायला काय हरकत आहे?' मनीषाला फोन केल्यानंतर 'जुन्या इंग्रजी क्लासिक्सची भाषांतरे हवी आहेत.' अशी माहिती मिळाली. हे ऐकून भाषांतरं न करण्याचा माझा बेत पुरता विरघळला.

डोस्टोव्स्की व टॉलस्टॉय हे माझे दोन अत्यंत आवडते लेखक आहेत. त्यांच्या 'द ईडियट' व 'वॉर अँड पीस' या कादंबऱ्या मराठीत आणायला मला आवडले असते. आता या विषयाची मलाच घाई झाली. 'जस्ट डायल'कडून श्री. शितल मेहतांचा फोन क्रमांक मिळवून मी त्यांना फोन केला. त्यांचा संपूर्ण कार्यक्रम ऐकून मी थक्क झाले. पुढील वर्षात त्यांना एकाच वेळी ४०० पुस्तकं प्रकाशित करायची होती. ही सर्व पुस्तके पुस्तकजत्रेत विकली जाणार होती. ३५ जिल्ह्यांतील १५० गावात या प्रदर्शन आयोजित करण्यात येणार होत्या. आणि म्हणे मराठी मेली! चल हट्! मेहतांचा खुलासा ऐकून मला अलिबाबाच्या गुहेपुढेच उभे राहिल्यासारखे झाले. एवढी अद्भुत कथा, सारी वस्तुस्थिती मी कधी ऐकलीही नव्हती. सत्तर वर्षे मी मराठीतून लेखन केले व अनेक प्रकाशकांशी माझा परिचय आहे. प्रत्येक वेळी 'मराठी पुस्तकांना खप नाही. मराठी वाचक पुस्तक खरेदी करीत नाही. ग्रंथालयातून आणूनच फक्त वाचतो. मराठी पुस्तकाची किंमत कमी करूनही वाचकवर्गात वाढ होत नाही.' अशा आशयाच्या तक्रारी मी ऐकल्या आहेत. त्या तक्रारींच्या विरुद्ध टोकाचा दावा व कृती मेहतांनी करून दाखवली होती व करीत होतेही. 'वाचकांशी मी थेट संपर्क साधतो. म्हणून माझी पुस्तके खपतात' – इति शितल मेहता. अर्थात् ओघानेच आले की पुस्तके चांगली हवीत. नाहीतर ६० पैशांनादेखील ती कोणी घेणार नाही. मराठी वाचक तसा खडूस आहे. परंतु तो एक उत्तम व साक्षेपी वाचक आहे. चांगल्या पुस्तकांना दाद देतो. मेहतांनी मला दहा पुस्तकं ई मेलवरून पाठवली. ती गोंडस आहेत. माफक किंमत असूनही आतील मजकुराचा दर्जा व प्रकाशनमूल्य इकडे मेहतांनी बारकाईने लक्ष पुरवले आहे.

गेली पाच वर्षे मेहतांचा हा उपक्रम चालू आहे. पण मला तो आताच समजला याचा मला बराच संकोच वाटला. कारण मराठी प्रकाशनातील घडामोडींची मला समग्र माहिती असते असा मला गर्व आहे. गर्वाचे घर खाली! दुसरे काय?

मेहतांचे एक तरी पुस्तक करून द्यायचे हा माझा निर्णय तात्काळ झाला. ४०० पैकी बऱ्याचशा पुस्तकांच्या भाषांतरांचे काम देण्यात आले होते. उरलेल्या पुस्तकांत डोस्टॉव्स्कीचे नाव नव्हते. पण त्याच्याबद्दल मेहतांनी एक छोटीशी नोट मागवली ती मी पाठवून दिली. पुस्तकांची यादी संपल्यानंतर मेहता म्हणाले की

त्यांच्याकडे काही सुटे विषयही आहेत. म्हणजे काय बाई? तर हे असे–व्यास, गौतम बुद्ध, अश्वत्थामा व सचिन तेंडुलकर पैकी व्यासांचे नाव ऐकताच मी पुरतीच सर्द झाले. व्यासांवर मी एक प्रकरण लिहिले आहे. परंतु व्यास चरित्र लिहिण्याची कल्पना मात्र माझ्या डोक्यात कधीही आली नव्हती. मेहतांच्या मनात आली. ''व्यासांवर लिहायला मला आवडेल. मात्र यात काल्पनिक मजकुराचे प्रमाण जास्त असेल. ही माय्थॉलॉजी आहे. इतिहास नाही. त्यामुळे लिखित संदर्भ फारसे नाहीत.''–मी.

''अर्थात असेल. असायलाच हवा पण माझ्याकडे व्यासांबद्दलचे संदर्भ अजिबात नाहीत.'' मेहता.

''मला नकोतही. माझ्याकडे व्यासांचे सर्व संदर्भ आहेत. पण व्यास तुम्हाला सुचला कसा?'' माझी जिज्ञासा अनावर.

''लोकांची मागणी आहे म्हणून सुचला. गौतम बुद्धांनाही मागणी आहे.''

म्हणजे मेहता फक्त पुस्तके विकीत नव्हते तर वाचकांच्या मागण्याही समजून घेत होते. गुड्! गुड्! माझे आजोबा धर्मानंद कोसंबी यांनी बौद्ध धर्म स्वीकारला व त्रिपीटकादि ग्रंथांचे संपादन केले. त्यामुळे मी बुद्धांच्या सावलीतच वाढले आहे. तरीही तो विषय मी बाजूला सारला. म्हणजे तो आपोआप बाजूला सरकला. कारण फोनवर बोलत असतानाच व्यास माझ्यासमोर उभे ठाकले व आपले चरित्र साडीच्या घडीसारखे माझ्यासमोर उलगडून टाकू लागले. अर्थात् तेच लिहायला हवे हे क्रमप्राप्तच.

बुद्धांपेक्षाही व्यासांच्या चरित्राबद्दल मला विशेष आकर्षण वाटले कारण व्यास– चरित्राला अनेक भावनांचे पैलू आहेत व व्यासांचा ज्या व्यक्तींशी परिचय आला त्या व्यक्तींचे आचार, विचार, भावना व जीवनरेषा यातही भरपूर व मनमोहक वैविध्य आहे. तेव्हा आधी व्यासच! कारण त्यांच्या जीवनकथेत इंद्रधनुष्यापेक्षाही जास्त रंगतरंग आहेत.

व्यासांचे चरित्र लिहिणे म्हणजे व्यासांच्या दृष्टिकोनातून महाभारताकडे पाहणे. महाभारतातील प्रमुख पात्रांचा व्यास आजोबा आहे एवढीच ठळक माहिती बहुतेकांना आहे. पत्रकाराने बातमी लिहिण्यापूर्वी का? कसे? केव्हा? कोणी? व कशासाठी? हे प्रश्न विचारावे लागतात व त्यांची उत्तरे शोधावी लागतात असे

पत्रकारिताशास्त्र सांगते. तद्वत्च चरित्र-लेखकालाही चरित्रमूर्तीविषयी असंख्य प्रश्न आपोआप उसळले. त्यांची उत्तरे म्हणजेच हे व्यास चरित्र-'चिरंजीवी महर्षी व्यास-' 'चिरंजीव' नव्हे. चिरंजीव हे आज्ञार्थी क्रियापद आहे. चिरंजीवी हे विशेषण आहे म्हणून चिरंजीवीच.

फोन कॉल संपताच प्रथम कागद पुढे ओढले. संबंधित व्यक्तींची यादी लिहून काढली आणि त्यांच्या वयाचा हिशेब मांडला. व्यास चरित्रासारख्या प्रदीर्घ कथेत पात्रांच्या वयाला असामान्य महत्त्व आहे. परंतु पुराणे व महाभारत यांची या बाबतीत तिळमात्र मदत मिळत नाही. वयाबद्दलच्या प्रश्नांना पुराणकारांचे एकच उत्तर आहे-'तो हजार वर्षे जगला.' हे उत्तर मराठी वाचकांना चालण्याजोगते नव्हते. पुराणांतील पात्रांना वयोमर्यादेच्या चौकटी नसल्यामुळे प्रेम, प्रेमचेष्टा, प्रेमयाचना व इतर तारुण्यसुलभ गोष्टी ते केव्हाही करतात. मराठी कादंबरीत हे शोभणार नव्हते.

तेव्हा प्रथम वयाची चौकट. व्यासजन्मावरून सत्यवतीचे वय ताडता आले व हे एक वय निश्चित होताच इतर सर्व पात्रांच्या वयांचा तौलनिक हिशेब भराभरा होऊ लागला. पुत्रांचा नऊ महिने उदरात वास, जन्म, शिक्षण, भांडणे, विवाह व पांडवांचा बारा वर्षे वनवास यांच्याद्वारे पुढे सरकत गेलेल्या काळाचा हिशेब करणे कठीण नाही. तसा मी केला आहे व त्या त्या ठिकाणी वये सूचित केली आहेत आणि त्या वयाचा संबंधित पात्रांवर कसा काय परिणाम झाला आहे हेही स्पष्ट केले आहे. याविषयी जास्त काही सांगत नाही. प्रस्तावना म्हणजे मधाचे बोट, मधाचा हंडा नव्हे. वयांचा आराखडा तयार करीत असताना व्यासचरित्रातली सर्वच पात्रे माझ्या मन:पटलासमोर साकार झाली. त्यामुळे बुद्धिपुरस्सर प्रश्न उकरून काढण्याचे प्रयोजन राहिलेही नाही. प्रश्नही आपोआप उमटले व हवेत तरळू लागले. नियोगाविषयी व्यासांच्या भावना काय होत्या? व्यासासंबंधी त्या दोन तरुण विधवांच्या मनात काय भावना होत्या? व्यास-सत्यवतीचे संबंध कसे काय राहिले? सत्यवतीच्या विविध घटनांना प्रतिक्रिया कोणत्या? नियोगाची विनंती करण्यासाठी भीष्मच व्यासाकडे गेले हे निर्विवाद; कारण तेच कुरूंचे 'सर्वेसर्वा' होते. या दोन व्यक्ती म्हणजे महाभारतांतली असामान्य व्यक्तिमत्त्वे. महामानव कृष्ण देव होता. पण हे दोघे मानव होते. पुन्हा पुन्हा स्वत:चे वर्तन व निर्णय धर्मनियमांच्या प्रकाशात तपासून पाहणे हा या दोघांच्याही व्यक्तिमत्त्वाचा विशेष होता. असा काटेकोरपणा

कुठल्याही दुसऱ्या पात्रांत नाही व पुन्हा कधी होणे नाही म्हणून या दोघांमध्ये अतूट स्नेहाचा बंध निर्माण झाला असे मी दाखवले आहे. त्यामुळे व्यासांचे हस्तिनापुरात व कुरू घराण्याच्या घडामोडीत पुन:पुन्हा आगमन होणे शक्य झाले. अन्यथा नियोग संपताच व्यास चरित्राचा बराच मोठा भाग समाप्त झाला असता.

भाषाशैली नाजूक ठेवणे क्रमप्राप्त झाले. कारण विषय भावनांचा आहे. राजकारणाचा नाही. तरीही संस्कृतप्रचुर मराठी मी वापरली आहे. त्याचबरोबर त्या काळातील राहणी, भोजन, वस्त्रालंकार, प्रवास, सामाजिक चालीरीती वगैरेंचे त्रोटक चित्रण मी केले आहे. या काळाची काही वैशिष्ट्ये ही– वस्त्रे विणण्याची कला अवगत होती. सुयांचाही शोध लागला होता. सुया अर्थात् जाडजूड होत्या. दाभण परंतु बाह्या व विजारींचे पाय शिवण्याच्या शास्त्राचा शोध लागला नव्हता. त्यामुळं अंतर्वस्त्रे व बाह्य वस्त्रे यांसाठी लहानमोठ्या वस्त्रांची पुडकीच वापरली जात होती. अलेक्झांडर भारतात आल्यानंतरच बाह्या असलेले अंगरखे व पाय असलेल्या विजारी तयार होऊ लागल्या. जातीही अलेक्झांडरने– रोमन संस्कृतीने आणली. तत्पूर्वी आर्य उखळ व दगडवजा पाटे–वरवंटे वापरीत होते. त्यामुळे पोळी वा भाकरी घडवण्याइतके बारीक पीठ मिळत नव्हते. विशेष प्रमाणात लोक कढवणच जेवीत होते. हिमालयातील पहाडी लोकात आजही ही प्रथा आहे. जात्यांचा शोध इ. स. पूर्वी ३००० वर्षात सुमेर संस्कृतीने लावला. पण आपण लावला नाही. काही तज्ज्ञांच्या मते रशियातील कॉकेशस पर्शि–पर्वतातून आर्यांच्या भटक्या टोळ्या प्रथम यात उतरल्या. तेथून एक शाखा युरोपात गेली. दुसरी आर्यावर्तात आली. परंतु युरोपात गेलेले काही आर्यही परत फिरले व आर्यावर्तात आले. पैकी एक कुरू हे लोखंड व कोळसा यांच्या शोधात आले होते. कारण ते या तंत्रज्ञानाचे दर्दी होते. हा तर्कवजा सिद्धांत मी स्वीकारला आहे.

जो काही प्राचीन इतिहास प्राचीन ग्रंथांच्या द्वारा उपलब्ध आहे त्यात कुरूंचा उल्लेख आहे पण पांडवांचा नाही. (एकच आहे तोही अपुरा.) परंतु एवढे नक्की की पांडवांनी कुरूंशी युद्ध केले व त्यांचा सपशेल पराभव केला. हे युद्ध घडण्यापूर्वी कुरू राजांनी अनेकविध पराक्रम गाजवले होते. या चरित्रांचे पोवाडे भाट गात असत व गावोगाव फिरत असत. पैकी एक रोमहर्षण. रोमहर्षणाला पांडवांनी 'कॉंट्रॅक्ट' दिले किंवा त्याने स्वेच्छेने घेतले की कौरवांच्या पराक्रमाच्या कथा पुसट करायच्या

व पांडवांच्या पराक्रमाचे नवीन पोवाडे तयार करायचे. एक प्रदीर्घ काव्य रचल्यास सोन्याहून पिवळे. हे साधण्यासाठी रोमहर्षणाने अनेक क्लृप्त्या वापरल्या हे माझेही आवडते प्रमेय आहे. तेही मी वापरले आहे. तात्पर्य हे की भावनातरंगांचे चित्रण माझे आहे. पण माहिती तर्कशुद्ध व शास्त्रसंमत आहे.

व्यासांचे नाव कृष्णद्वैपायन असेही आहे. यामुळे काही पंडितांचा सिद्धांत असा की महाभारतातील कृष्ण म्हणजे व्यासच. व्यासांनी महाभारत रचले, तथा घडवलेही व त्यातील स्वत:ची भूमिका विशद करण्यासाठी त्यांनी स्वत:चे 'कृष्ण' असे टोपणनाव महाभारतात केले. तो सिद्धांत मी स्वीकारलेला आहे. महाभारताच्या संहितेत तो चपखल बसतो. महाभारत लिहिले कोणी? व्यासांनी की रोमहर्षणानी? याबद्दल वाचकांच्या मनात घोळ आहे; परंतु ते रोमहर्षण व त्याचा पुत्र उग्रश्रवस् यांनी लिहिले असे माझे व अनेकांचे मत आहे. याला कारण असे की व्यास रचनाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी स्वतंत्रपणे साहित्यनिर्मिती केल्याचा पुरावा नाही. रोमहर्षण प्रतिभाशाली भाट व कीर्तनकार होता. खेरीज तो व्यासांचा शिष्यही होता. व्यास-चरित्रात रोमहर्षणाला महत्त्वाची भूमिका आहे. ती मी स्पष्ट केली आहे.

प्रस्तुत महाभारताचा विस्तार अफाट मोठा आहे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिरात एक संपूर्ण भिंत महाभारताच्या पर्वांनी भरून गेली आहे. मूळ महाभारत शोधून काढण्याचे काम या संस्थेने हाती घेतले. महाभारतात अनेक लेखकांनी आपल्या कविता, कथा व लेख घुसवले आहेत. त्या काळी लेखकांना स्वत:च्या नावाची प्रसिद्धी नको होती. आपल्या लेखनाला वाचक मिळावेत एवढाच त्यांचा उद्देश होता. महाभारताची लोकप्रियता अफाट म्हणून त्या संहितेवर अन्य लेखकांनी त्याच तोडीचे अफाट आक्रमणही केलेले आहे. प्रस्तुत संस्थेने ही आक्रमणे गाळून किंवा क्वचित् वेळी ती तळटीपेच्या जागी छापून मूळ संहिता तयार केली आहे. पण खरी मूळ संहिता ही नव्हे. खरी मूळ संहिता आता लुप्त झाली आहे. सापडणे शक्य नाही. परंतु जय किंवा विजय नावाच्या एका दीर्घकाव्याचे उल्लेख सापडतात. ही महाभारतातील युद्धाची मूळ कथा आहे. तिच्यात रोमहर्षणाने नंतर रंग भरले असे विद्वानांचे म्हणणे आहे. रोमहर्षणाने गीतेचा पहिला अध्याय लिहिला असे मला वाटते. १८ अध्यायांची समग्र गीता रणांगणावर सांगणे